Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची १२१ वी जयंती उत्साहात साजरी

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे दि. २७ डिसेंबर, २०१९ रोजी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची १२१ वी जयंती साजरी करण्यात आली आहे. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डी. पार्लावार, यांचे अध्यक्षतेखाली तसेच डॉ. सुरेश नेमाडे, कार्यक्रम समन्वयक अधिकारी, कृ. वि. के. यवतमाळ, प्रा. निलिमा पाटील, अन्नतंत्र महाविद्यालय यवतमाळ, प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. प्रशांत शिंगाटे यांचे उपस्थितीत पार पडला.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते हारार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डी. पार्लावार यांनी डॉ पंजाबराव देशमुख यांचे कार्यावर प्रकाश टाकला. १९५९ मध्ये दिल्लीला भरविलेल्या पहिल्या भव्य अशा जागतीक कृषि प्रदर्शनी ही भाऊसाहेबांचीच प्रेरणा होती. तसेच तेलंगना राज्यातील निजामांना बोलावून विदर्भातील कृषी व सिंचन योजना सबळ करण्यासाठी प्रयत्न केला, ते त्यांच्या दुरदृष्टीचे प्रतीक होते. त्यांनी शिवाजी शिक्षण संस्था अमरावती येथे निर्माण करून विदर्भात शिक्षणाची ज्ञानगंगा आणली. त्यांनी दोन हजार एकर जमीन विद्यापीठाला दान करून अकोला येथील कृषी विद्यापीठाची पायाभरणी केली. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख दुरदृष्टी असलेले महामानव होते. त्यांनी गोरगरिब रंजल्यागांजल्यांसाठी कार्य करून त्यांचे जीवनमान कसे उंचवता येईल, यासाठी कार्य केले. त्यांच्या जयंतीनिमित्त डॉ. पंदेकृवि, अकोला येथे भव्य राज्यस्तरीय “ॲग्रोटेक कृषी” प्रदर्शनीत विविध राज्याचे संशोधक व त्यांचे संशोधनाचे तंत्रज्ञान यांचे दालन येथे प्रदर्शीत केलया जातात. विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांची समस्या जाणून घेवून शेती उपयोगाचे संशोधन करावे असे आवाहन केले.

डॉ. सुरेश नेमाडे यांनी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे हरितक्रांतीचे प्रणेते, अन्नदाता, स्वतंत्र भारताचे प्रथम कृषीमंत्री होते त्यांनी कृषी संदर्भात देशाला दिशा देण्याचे कार्य केले असे विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अविनाश घुगे या विद्यार्थ्याने केले. तर आभार प्रदर्शन कु. वैष्णवी जंगले या विद्यार्थीनीने केले. कु. सोनाली शिरस्कर, विश्वास राठोड व सौरभ ठाकरे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला श्री. मंगेश शेटे, सहायक कुलसचिव, डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, रूपेश राऊत, एकनाथ भंकाळे, भारती मेश्राम, पंकज जैन, दिपाली शिंदे, अस्मिता पाटील, प्रविण डोंगरे, शुभम धार्मिक, निळकंठ मानकर, तसेच अन्नतंत्र महाविद्यालयातील, कृ. वि. के. येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.

Click Here to upgrade to
Unlimited Pages and Expanded Features